# सीपीआरचा भार खासगी रुग्णालयांकडे

## पालकमंत्र्यांचा संवाद; सीपीआरनंतर 'डी. वाय.', शिवाजी विद्यापीठात वसतिगृहे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : कोरोना संशयित आणि रुग्णांसाठी सीपीआर राखीव केल्याने येथे येणाऱ्या रुग्णांवर सीपीआरप्रमाणेच मोफत उपचार करण्याचा भार खासगी रुग्णालयांनी उचलला आहे. हे कार्य आरोग्य सेवेसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून पालकमंत्र्यांनी आज सर्वांचे व्हिडिओ कॉन्फन्सवरून अभिनंदन केले. सीपीआरच्या क्षमतेनंतर कोरोना रुग्णांसाठी डॉ. डी वाय पाटील रुग्णालय वैद्यकीय सेवा देणार असल्याचे डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी मान्य केल्याचेही जाहीर केले. जिल्हाधिकारी कार्यालयातून पालकमंत्री पाटील यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे खासगी रुग्णालयांच्या डॉक्टरांशी संवाद साधला.

पालकमंत्री पाटील म्हणाले, ''अन्य उपचारांसाठी सीपीआरमध्ये येणारे रुग्ण सेवा रुग्णालयातून संदर्भ चिठ्ठीद्वारे आपल्याकडे पाठविण्यात येत आहेत. त्यांच्यावर सामाजिक बांधिलकीतून मोफत उपचार करावेत. सकृतदर्शनी कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी पीपीई कीट वापरण्याचे निर्देश आहेत. बाजारातून उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आपणही तसे प्रयत्न करावेत.''

डॉ. आशा जाधव म्हणाल्या, ''इंडियन मेडिकल असोसिएशनने कालच यादी मागवून घेतली आहे. पीपीई कीट ते पुरवणार असल्याचे सांगितले. यावेळी पालकमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले.''



**कोल्हापूर : जिल्ह्यातील खासगी डॉक्टरांशी शनिवारी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधताना पालकमंत्री सतेज पाटील. शेजारी जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व अन्य अधिकारी.**

पालकमंत्री म्हणाले, ''पहिल्या टप्प्यासाठी सीपीआर, सीपीआरच्या रुग्ण क्षमतेनंतर दुसऱ्या टप्प्यासाठी डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय रुणालय सेवा देणार आहे. तिसऱ्या टप्प्यासाठी शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहे अशी संभाव्य प्रादुर्भावाविषयी पूर्वतयारी केली आहे. खासगी रुग्णालयांकडे येणाऱ्या रुग्णांमध्ये कोरोना संशयित लक्षणे आढळल्यास त्यास थेट सीपीआरला पाठवावे. शासनामार्फत सर्वांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल.''

डॉ. अर्जुन आडनाईक, डॉ. अभ्यंकर, डॉ. आशुतोष देशपांडे, डॉ. पद्मराज पाटील, डॉ. विनायक शिंदे, डॉ. संदीप साळोखे, डॉ. हर्षवर्धन जगताप, डॉ. शुभांगी पार्टे, डॉ. सुजित पाटील, डॉ. संदीप पाटील, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. मंजुळा पिशवीकर, डॉ. उल्हास दामले, डॉ. जयंत वाटवे आदींनी यामध्ये सहभाग घेतला. यावेळी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त व अन्य अधिकारी उपस्थित होते.

# विविध बोलींच्या डाटाबेसमध्ये गुंततो दिवस

## प्रा. डॉ. पद्मा पाटील यांचा दिनक्रम ; पक्के नियोजन आणि अखंड काम

### » संचारबंदीतले दिवस...

**प्रा. डॉ. पद्मा पाटील शिवाजी विद्यापीठाच्या माजी हिंदी विभागप्रमुख, तसेच त्यांचे आजोबा रामराव देशमुख सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते, तर वडील स्वातंत्र्यसैनिक आर. एन. पाटील कम्युनिस्ट पक्षाचे शिलेदार. पाटील यांच्या विचारधारेत त्यांचे अंश आहेत. साताऱ्यात त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण झाले. ११ वर्षे हिंदी विभागप्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. पाटील नियोजनात अनुभवी असल्याने त्यांनी कामाचा गाजावाजा कधीच केला नाही. अखंड कार्यरत असावे, हे तत्त्व त्यांच्या कामाला गती देणारे आहे. दुपारच्या वामकुक्षीला बगल देत त्या विविध बोलींचा डाटाबेस करण्यात गुंतल्या आहेत.**

**- संदीप खांडेकर**



**शिवाजी विद्यापीठाच्या माजी हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्मा पाटील कामात व्यस्त असताना.**

### शाहू महाराजांचे कायदे हिंदीत अनुवादित करण्याचे काम

विद्यापीठातून सेवानिवृत्त होऊन त्यांना वर्ष होतंय. सेवानिवृत्तीनंतर सहलींचे प्लॅनिंग ठरविले जाते; पण डॉ. पाटील त्या मोहापासून दूर आहेत. हिंदी भाषेत काम करण्याचं वेड त्यांना भलतेच आहे. स्वयंशिस्त, हे त्यांचे वैशिष्ट्य कायम आहे. कोरोनामुळे भलेही त्यांचं बाहेर फिरणं थांबलं असलं, तरी त्या गुरुदयालसिंग यांच्या 'मैं क्या जानू कौन' हे हिंदी आत्मचरित्र मराठीत अनुवादित करत आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कायदे हिंदीत अनुवादित करण्याचं कामही थांबलेले नाही.

विद्यापीठापासून हाकेच्या अंतरावर पाटील यांचे घर. घराबाहेर पडण्याची सोय नाही. कोरोना इफेक्टच्या बातम्या तणाव वाढवतात.

सकाळी सात ते दुपारी एकपर्यंत घरगुती कामे आटोपतात. एक वाजल्यानंतर डॉ. पाटील राष्ट्रभाषेच्या सहवासात दंग होतात. हिंदीतील 'राजमाता जिजाबाई' खंडकाव्याच्या मुद्रितशोधनावर नजर फिरवणं सुरू होतं. लिपी नसणाऱ्या बोलींचे त्यांनी कलेक्शन केलंय. आंदवण, गोसावी, कुचीकोरवी, पाथरवट बोलींचे अर्थ तयार करण्याचे काम तितकसं सोपं नाही, तर ते शिरावर घेऊन डाटाबेस तयार करण्याचं शिवधनुष्य त्या पेलत आहेत. कोल्हापूर, सातारा, आंध्र प्रदेशमध्ये बोली बोलणाऱ्या लोकांच्या अभ्यासाभोवती त्या घुटमळतात. 'प्लॅगॅरिजम डिटेक्शन टूल फॉर हिंदी टेक्स्ट'चे कामाने वेग पकडलाय. ऑनलाईन ट्रान्स्लेशनच्या कामाला त्या प्राधान्य देतात. शेती, शैक्षणिक, औषधनिर्माणशास्त्र अशा विविध क्षेत्रांशी ते संबंधित असल्याचे त्या सांगतात. 'इतकं काम कसं जमतं तुम्हाला?,' या प्रश्नावर त्या बोलत्या झाल्या. ''सेंट झेव्हियर्स हायस्कूलपासून कामाचा श्रीगणेशा सुरू झाला. विलिंग्डनमध्ये हिंदी विषयाचे अध्यापन केले. औरंगाबादमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात १२ वर्षे होते. शिवाजी विद्यापीठात आल्यानंतर ११ वर्षे विभागप्रमुख पद सांभाळले. दर्जेदार कामाला प्राधान्य दिले.'' आर्टिस्ट म्हणून डॉ. पाटील काम करत असल्याचं लक्षात आलं. त्यांचं आयुष्य वैविध्यपूर्ण कामांमुळे बहरल्याची जाणीव घट्ट झाली.